# EXECUTIVE SUMMARY

## विषय : ''संगीत चिकित्सा पद्धतीत वाद्यसंगीताचा अधिक प्रभाव – एक चिकित्सक अभ्यास''

ज्या कलेत स्वर आणि लय या मुलभूत घटकांद्वारे रसोत्पत्ती केली जाते. त्या कलेला ''संगीतकला'' असे म्हणतात. ज्यामध्ये गीत वाद्य आणि नृत्य ह्या तिन्ही कलाविशेषांचा समावेश होतो. ह्या सुयोग्य एकत्रीकरणाला 'संगीत' असे म्हणतात. गायन, वादन आणि नर्तन ह्या तीनही कला एकदुसऱ्यावर अवलंबून आहे. आणि गीत प्रधान असल्यामुळे या तिनही कला संगीत या शब्दात मोडतात. संगीत चिकित्सा पद्धतीत वाद्य संगीताचा अधिक प्रभाव या प्रकल्पात वरील प्रस्तुत चारही प्रकरणात संगीत चिकित्सा पद्धतीचा मानवी शरीरावर होणारा परिणाम व तसेच संगीत चिकित्सा पद्धतीत वाद्यांचे अधिक महत्व यांचा अभ्यास केलेला आहे. विशिष्ट वाद्यांच्या विशिष्ट स्वरसंगतीने निर्माण होणाऱ्या स्वरलहरींचा मानवी शरीरावर थेट परिणाम साधल्या जातो. हे विज्ञानाने केव्हाच सिद्ध केलेले आहे. कमी रक्त दाबाच्या रोग्याला द्रुत गतीचे संगीत ऐकवल्यास त्याचे हृदय जलदगतीने कार्य करून रक्तदाब पुर्ववत होऊ शकतो. अशाच प्रकारे विविध रोगांवर व आजारांवर सुद्धा वाद्य संगीताद्वारे संगीत चिकित्सा पद्धतीद्वारे उपचारात्मक प्रयोग केलेले सिद्ध झालेले आहे.

प्रस्तुत प्रकल्प अध्ययनात वाद्य आणि वाद्यांचे वर्गीकरण वाद्यांचा उगम आणि विकास, वाद्यांची निर्मिती व संपूर्ण उपयोगीता यांचे विस्तृत अध्ययन तसेच वाद्य वर्गीकरणातून वाद्यांचे प्रकार आणि वाद्यांच्या चार पद्धती व त्याचे वर्गीकरण तुलनात्मक रितीने विवेचनात्मक वादन शैलीचे एक वेगळे महत्व या चार पद्धतीतून वाद्यांचे प्रयोगात्मक प्रयोजन दिसून येते.

संगीतातील दोन संगीत पद्धतींचे तुलनात्मक महत्व त्या पद्धतीची माहिती व त्या पद्धतींमध्ये वाद्यांचे स्थान, उपयोगीता, उत्कृष्ट नोटेशन पद्धती, वाद्यनिर्मिती आणि संगीत चिकित्सा पद्धतीत वाद्यांचे महत्व दर्शविलेले आहे.

संगीत चिकित्सा पद्धतीत वाद्यांचा प्रभाव अधिक प्रमाणात व महत्वाचा आहे. ॲक्युप्रेशर, बोटांच्या हालचाली वादनांद्वारे बोटांवर पडणारा दाब व त्याचा परिणाम आणि इतरही बऱ्याच गोष्टीत वाद्यांचा प्रभाव दिसून येतो. बालकांच्या बौद्धीक विकासात संगीताचे व वाद्यांचे महत्व काय, शरीर स्वास्थ्यावर रागांचा परिणाम, रागांद्वारे होणारे उपयुक्त सकारात्मक परिणाम, मनस्वास्थावर रागांचा व वादनांचा परिणाम आणि प्रभाव तसेच शरीर व मनस्वास्थ्यासाठी संगीत उपचार किंवा संगीत चिकित्सा पद्धतीतून मानवी मनावर होणारा सकारात्मक परिणाम व बदल किंवा संगीत चिकित्सा पद्धतीद्वारे रोगांवर व आजारावर एक रामबाण औषध म्हणून शास्त्रीय संगीताची रागांची व तालवाद्यांची विशेष पकड आहे व त्याद्वारे रोग्यावर विशिष्ट

असा सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत ज्या ज्या गीतशैली व गीत प्रकार लोकप्रिय प्रचलीत होते त्यांचा राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि खाजगी स्तरावर आवश्यकतेनुसार प्रयोग व उपयोग केला गेला. ज्याचे मुख्य उद्दीष्ट मनोरंजन एवढेच होते. संगीत हे फार मोठे मनोरंजनाचे एकमताने माध्यम मानल्या गेले आहे. संगीताच्या श्रवणाने मन प्रसन्न होते, प्रफुल्लीत होते, शांत व टवटवीत होते. संगीताच्या रसास्वादाने जसी मनशांती मिळून मन तजेल व शांत होते त्याच प्रमाणे संगीतामुळे ताणतणाव सुद्धा कमी होण्यास खूप मोठी मदत होते. या स्पर्धेच्या युगात ताणतणाव कमी करण्यासाठी व ताणतणावातून उद्भवणाऱ्या रोगांच निवारण करण्यास संगीताची औषधात्मक महत्वाची भूमिका हल्ली संशोधनाद्वारे मांडली गेली आहे. रागदारी संगीताच्या सहाय्याने व श्रवणाने शारीरिक व मानसीक विकारांचे निवारण करण्याचे शोध कार्य अत्यंत उत्कृष्ठरित्या सुरू आहे. एखाद्या विशिष्ट रागाच्या श्रवणाने एखादा विशिष्ट रोग काही अंशी बरा होतो अथवा रोग्याची तीव्रता कमी होण्यास मदत होते. संगीतात मनोरंजन करणे व मन एकाग्र करण्याची मोठी शक्ती आहे व विशिष्ट रागदारी संगीताची आलापचारी ऐकताना मन कळत नकळत एकाग्र होते. व त्यामुळे रोगाच्या तीव्रतेची जाणीव ती हळूहळू होण्यास कारणीभूत होते.

वरील लघुशोध प्रकल्पात संगीत चिकित्सा पद्धतीतून वाद्यांचे महत्व संगीत चिकित्सेतून वाद्य संगीताची उपयोगीता व विवेचनात्मक वर्णन, अध्ययन इत्यादींचा अभ्यास योग्य पद्धतीने केलेला आहे.

****